# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

(नोटीस)

स्थायी समितीची सभा **मंगळवार दिनांक ०८/०९/२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता** सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे सभा** आयोजित करण्यात येत आहे.

उपरोक्त बैठकीच्या बाबतीत **Video Conferencing** ची लिंक ३० मिनीट अगोदर स्थायी समिती सदस्यांना तसेच अधिकारी वर्गांना कळविण्यात येईल.

**Webex व्दारे होणाऱ्या Video Conferencing's सुरळीत करण्यासाठी सूचना**

Video Conference ने सहभागी होणाऱ्या मा. पदाधिकारी/अधिकारी/सदस्य वर्गांनी खालील सूचनांचे पालन करावे हि विनंती.

१. कृपया Cisco Webex Meettings हा ॲप Play Store/App Store वरुन Download करुन ॲपमध्ये रजिस्टर्ड झाले आहे याची खात्री करावी.

२. कृपया सभेच्या वेळेच्या २० मिनीट अगोदर आपली उपस्थिती दर्शवावी.

३. कृपया सभा चालू झाल्या पासून सभा संपे पर्यंत सर्वांनी जागेवर बसून सभेच्या लिंक वर उपलब्ध राहावे.

४. अधिकाऱ्यांनी कृपया सभा चालू असतांना काही कारणास्तव सभेच्या लिंक बाहेर गेले असल्यास आपले विषयाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गास नेमणूक करुन सभेच्या कामकाजा विषयी समजून घेण्यास निर्देशीत करावे व मा. सभापती, स्थायी समिती, महोदयांनी विचारलेल्या प्रश्नांची निट माहिती दयावी .

५. कृपया बोलत नसताना स्वतला : Webex च्या ॲप मध्ये निःशब्द Mute करावे.

६. कृपया Headphone चा वापर करावा.

७. कृपया Mobile Internet सुरळीत पणे सुरु आहे याची खात्री करून घ्यावी.

८. कृपया मोबाइल लॅपटॉप / टॅब / ची Battery कमीत कमी ६० % असावी.

९. कृपया आपला मोबाईल/टॅब/लॅपटॉप योग्य प्रकारे कार्य करीत असल्याची खात्री करावी .

१०. कृपया वेळेवर उपस्थित रहावे.

११. कृपया कॅमेरा योग्यरित्या फ्रेम करावा.

१२. कृपया कॅमेऱ्यामध्ये पहावे.

१३. कृपया व्यवस्थिपणे लक्ष द्यावे.

**टिप :-** निजी सहाय्यक/लिपीक, मा. सभापती, स्थायी समिती कार्यालय यांनी माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा कार्यालयाचे कर्मचारी **श्री. स्वप्नील लोखंडे मोबाईल क्र. ९८२३८११९२७ व ९९७५७६५४३६ यांचे कडून सभेच्या ४५ मिनीट आधी उपरोक्त सभेची लिंक** प्राप्त करुन घ्यावी व तसे मा. सभापती, स्थायी समिती व स्थायी समितीच्या मा सदस्य/सदस्या व अधिकारी वर्गास व्हॉटस् ॲपवर **लिंक** पाठवावे व तशी बैठकीच्या वेळी नोंद ठेवावी.

आदेशान्वये

नागपूर
दिनांक :- ०४/०९/२०२०

हस्ता/-
(महेश मोरोणे)
निगम सचिव (प्र.)
महानगरपालिका, नागपूर

## मागील विचाराधिन विषय
**(दिनांक 01/09/2020)**

**वि.क्र.२१ :-** मा. स्थायी समिति ठराव क्र. ३१२
(घनकचरा व्यवस्थापन विभाग) दि. ०७/०९/२०१९ नुसार म.न.पा. उपद्रव शोध पथक अंतर्गत दुसऱ्या टप्यात ८७ लष्करी सेवानिवृत्त कर्मचारी यांना ११ महिन्याचा कंत्राटी करारावर पथकात निवड करण्यात आले होते. ८७ पैकी ४४ कर्मचारी पथक सोडून गेल्याने ४३ कर्मचाऱ्यांना पथकात दि. ०९/०९/२०१९ ते दि. ३१/०७/२०२० पर्यंतच्या ११ महिन्याचा कालावधी करीता कंत्राटी आदेश देण्यात आले होते.

उपरोक्त ४३ पैकी २ कर्मचारी यांनी मुदत संपण्यापुर्वीच राजीनामा दिल्याने दुसऱ्या टप्यात ४१ कर्मचारी सध्या कार्यरत असून त्यांचे ११ महिन्याचे कं़त्राटी करार दि. ३१/०७/२०२० रोजी संपुष्ठात आले आहे.

२) मा. स्थायी समिती ठराव क्र. ३१२ विषय क्र. ३०४ दि. ०७/०९/२०१९ अन्वये प्रथम टप्यातील कार्यरत ३८ लष्करी सेवानिवृत्त कर्मचारी यांचे (तिसरे) ११ महिन्याचे कंत्राटी करार दि. ०१/०९/२०२० रोजी संपुष्ठात येत आहे.

उपरोक्त १ ते २ यांना पुन्हा पुढील ११ महिन्याचा कंत्राटी करारावर त्यांचें कार्यकाळ पुढेही सुरू ठेवण्याकरीताचा मंजुरीचा विषय मा. स्थायी समितीने विचारात घेणे.
(टिप :— सविस्तर माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.)

## नवीन विषय

**वि.क्र.२२ :-** नागपूर महानगरपालिका अंतर्गत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत
**{आरोग्य विभाग}** कोरोना विषाणु (कोव्हिड-19) प्रादुर्भाव लक्षात घेता मार्गदर्शक सूचनेनुसार महानगरपालिका अंतर्गत 5 Dedicated COVID Health Centre सुरू करण्यात येत आहे. त्याकरिता खालील तक्त्यानुसार मनुष्यबळाची आवश्यकता आहे. करीता प्राप्त कोव्हिड-19 PIP अंतर्गत कंत्राटी / करार पध्दतीने मानधन तत्वावर पदभरती करणे आवश्यक आहे.

कंत्राटी स्वरुपात नेमलेले फिजिशियन तसेच इनसेनटिव्हीस्ट यांना D.C.H. रूग्णालयात काम करत असल्यास दरमहा रूपये 75000/- फिक्स, तसेच PIP अंतर्गत अतिरिक्त इनसेनटिव्ह अधिक रूपये 1.25 लाभ पर्यन्त कोविड-19 सेवा दिल्याबद्दल एकूण रूपये 2 लाख वेतन, तसेच 11 पदांसाठी 50,000/- म.न.पा. निधीतून **प्रत्येकी** याप्रमाणे एकूण 5.50 लक्ष तसेच वाढीव पदांना NUHM मधून मान्यता न मिळाल्यास व मनपा तर्फे पदनिहाय अतिरिक्त Incentive रक्कम यानुसार फिजिशियनसह इतर आवश्यक पदांबाबत खालील प्रमाणे तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

| Sr. No. | Name Of Post | No.Of Post Required | PIP Approved Post for Nagpur City | PIP Approved Salary | Additional Incentiv | Additional Incentive from NMC | As per requireement NMC incentive for 1 month | Total Honorium Per Month | Expected NMC exp. Per month (If extra post not saction by NUHM |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Specialist (Intensivisit , Physician, Anasthetist ) | **11** | **3** | **75000** | **125000** | **50000** | **550000** | **Up to 250000** | **2150000 for remaing 8 Post** |
| **2** | Medical Officer | **37** | **38** | **60000** | **0** | **40000** | **1480000** | **Up to 100000** | |
| **3** | AYUSH MO | | **197** | **28000** | **0** | **22000** | **0** | **Up to 50000** | |
| **4** | Hospital Manager | **5** | **38** | **35000** | **0** | **0** | **0** | **35000** | |
| **5** | Staff Nurse | **115** | **675** | **20000** | **0** | **10000** | **1150000** | **Up to 30000** | |
| **6** | ANM | | **0** | **18000** | **0** | **7000** | **0** | **Up to 25000** | |
| **7** | X-Ray Technician | **5** | **4** | **17000** | **0** | **8000** | **40000** | **25000** | |
| **8** | ECG Technician | **5** | **4** | **17000** | **0** | **8000** | **40000** | **25000** | |
| **9** | Data Entry Operator | **10** | **67** | **17000** | **0** | **0** | **0** | **17000** | |
| **10** | Ward Boy | **30** | **30** | **Daily wages Rs.400/- per day** | **0** | **200** | **6000** | **Daily wages Rs.600/- per day** | |
| | Total | | | | | **145200** | **3266000** | | |

तसेच अधिकारी / कर्मचारी यांना ICUमध्ये PPE परीधान करून पूर्णवेळ काम करत असतील तर M.B.B.S./B.A.M.S./BUMS/BDS यांना रू. 10,000/- व स्टाफ नर्स यांना रू. 7000/- तसेच इतर कंत्राटी कर्मचारी यांना रू. 3000/- देण्यात येईल असे नमूद आहे. तद्नुसार NUHM ,COVID PIP अंतर्गत अदा करण्यात येईल सदर Additional Incentive वगळून उरलेली रक्कम म.न.पा. अनुदानातून भागविण्यात येईल.

1) सद्यस्थितीत एक महिन्याकरीता रू. 32,66000/- इतका खर्च अपेक्षीत असून तुर्तास 3 महिन्याकरिता रू. 97.98 लक्ष खर्च अपेक्षीत असून हा खर्च वैद्यकीय आरोग्य विभागातील आस्थापना खर्चातून करण्याचे प्रस्तावीत असून, उक्त प्रमाणे विषयास व खर्चास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

2) कोव्हिड ची साथ 3 महिन्यात न संपल्यास आवश्यकतेप्रमाणे उपरोक्त नमूद प्रमाणे रू. 32.66 लक्ष प्रतिमहा प्रमाणे पुढील कालावधीत आरोग्य विभागातील आस्थापना खर्चातून उक्त खर्च करण्याबाबत मान्यता देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

---